माध्यमिक शाळांत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करणे या योजनेत सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रं. इबीसी–१०९४/प्र. क्रं. १०९/मावक–२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक १७ ऑगस्ट १९९५

वाचा:–शासन निर्णय शिक्षण व समाज कल्याण विभाग क्रं. इबीसी–१०६६/५४७८७/जे दिनांक २९. ८. १९६६

प्रस्तावना:–माध्यमिक शाळांत हुशार, गुणवत्तापूर्ण मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी या योजनेखाली शाळेतील प्रत्येक इयत्तेमधून ५०% हून अधिक गुण मिळविणाऱ्या पहिल्या २ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. १०वीच्या विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य दिले जाऊन निधीच्या उपलब्धतेनुसार ५वी पर्यंत क्रमाक्रमाने योजनेची व्याप्ती वाढविली जाते. या योजनेनुसार सध्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी ही शिष्यवृत्ती अत्यंत अल्प प्रमाणात दिली जाते. याचा विचार करून सध्याच्या शिष्यवृत्तीच्या दरात बदल करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:–या योजनेचा विचार करून सोबतच्या परिशिष्ट "अ"मध्ये नमूद केलेल्या शिष्यवृत्ती योजनेच्या नियमावलीप्रमाणे सन १९९५–९६ या शैक्षणिक वर्षापासून शिष्यवृत्तीच्या दरात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देत आहे.

इयत्ता ५ वी ते ७ वी – रु. २०/–द. म. [१० महिने जून ते मार्च ]
इयत्ता ८ वी ते १०वी –रु. ४०/–द. म. [ –"– ]

२. या बाबीवरील होणारा खर्च "मागणी क्रं. एन–७ २२२५–अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१–अनुसूचित जातीचे कल्याण–२७७ शिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना[बी]महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना अनुदाने, ४१–सहायक अनुदाने [२२२५ ०५४७[विघायो] व ०३–मागासवर्गीयांचे कल्याण २७७ शिक्षण [एक] निरधिसूचित जमाती व भटक्या जमाती यांचे कल्याण [बी] पंचवार्षिक योजनेतर्गत योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने ४१–सहायक अनुदाने[२२२५ ०८९८] च्या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यात येऊन हा खर्च यावर्षी यासाठी प्रतिवर्षी करण्यात येणाऱ्या मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सन १९९५–९६ या वर्षाकरिता येणारा खर्च वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यात येऊन शासन ज्ञापन समाज कल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रं बीपीटी–१०९५/प्र. क्रं. ३३ अर्थसंकल्प दिनांक ८. ८. ९५ अन्वये मंजूर अतिरिक्त अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

...२...

४. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३६३/९५/व्यय-११, दिनांक १२. ६. ९५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सही- xxxxx
[ज. आ. गोडल]
अवर सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद
महालेखापाल महाराष्ट्र-१/२लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता]मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखाधिकारी मुंबई
सर्व कोषागार अधिकारी.
निवड नस्ती, भावक-२

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
समाज कल्याण विभाग
जा. क्र. जिप/सक/२/७४/१९९५
पुणे दिनांक १७-२-१९९६

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
सर्व मान्यता प्राप्त प्राथमिक व माध्यमिक शाळा
ता.            जि. पुणे

२/-/शासन निर्णयानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात आलेली गुणवत्ता शिष्यवृत्तीची सन १९९५-९६ पासूनची रकमेची बिले सुधारीत दराने तयार करून या कार्यालयास सादर करावीत.

समाज कल्याण अधिकारी
पुणे जिल्हा परिषद पुणे

परिशिष्ट- अ

## शिष्यवृत्ती योजनेची नियमावली

१) शिष्यवृत्ती योजना मान्यताप्राप्त प्राथमिक/माध्यमिक शाळेतील इ. ५वी ते १० वी च्या वर्गामध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी आहे.

२) ही योजना सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून अंमलात येईल.

३) सदरहूची शिष्यवृत्ती मागील वार्षिक परीक्षेत कमीत कमी ५०% गुण मिळवून प्रथम व द्वितीय क्रमांकाबरोबर उत्तीर्ण झालेल्या गुणवत्ता प्रधान मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येईल.

४) सदरहूची शिष्यवृत्ती प्रत्येक इयत्तेतील ~~प्रथम व~~ द्वितीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यास मंजूर करण्यात येईल.

५) या शिष्यवृत्तीसाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उत्पन्नाची अट राहाणार नाही.

६) शिष्यवृत्ती ही मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शाळेतील नियमित हजेरी, समाधानकारक प्रगती व चांगली वर्तणूक असल्यास मंजूर करण्यात येईल.

७) ही शिष्यवृत्ती इ. ५वी ते ७वी या वर्गामध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना द. म. रु. २०/- प्रमाणे [१० महिने] इ. ८वी ते १०वीच्या वर्गात शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना द. म. रु. ४०/- प्रमाणे [१० महिने] मंजूर करण्यात येईल.

८) ही शिष्यवृत्ती दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या कालमर्यादेपुरतीच म्हणजेच जून ते मार्च या १० महिन्यासाठी मंजूर करण्यात येईल.

९) ही शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

१०) ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यासाठी सर्व मान्यताप्राप्त प्राथमिक/माध्यमिक शाळांकडून गुणवत्ताप्रधान मागासवर्गीय विद्यार्थ्यांची माहिती मागविण्यात येईल.

११) सदरहूची शिष्यवृत्ती समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद मंजूर करतील व मागील वार्षिक परिक्षेत कमीत कमी ५०% गुण मिळवून प्रथम व द्वितीय क्रमांकात उत्तीर्ण होणाऱ्या पहिल्या दोन

Scanned by CamScanner

Kind atten - Mr. Ganga Kumar Vishwas

माध्यमिक शालांत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करणे...

अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन.
समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन परिपत्रक क्र. विसअजा. ५०९११/इबीसी. १०९७/७७२/प्रक्र. २१/
मावक- २.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- १२ फेब्रुवारी- १९९८.

वाचा : शासन निर्णय समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. इबीसी. १०९४/प्रक्र. १०९/मावक. २, दिनांक- १७ ऑगस्ट- १९९५.

परिपत्रक माध्यमिक शालांत इयत्ता ५ वी ते इयत्ता १०वी मध्ये शिकत असलेल्या हुशार व गुणवत्तापूर्ण मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती प्रदान करणे बाबतची सुधारित योजना शासन निर्णय क्र. इबीसी. १०९४/प्रक्र. १०९/मावक. २, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, मंत्रालय, दिनांक- १७ ऑगस्ट- १९९५ अन्वये कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या योजनेनुसार इयत्ता ५वी ते इयत्ता १०वी मधून ५०% हुन अधिक गुण मिळविणा-या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती विहीत वेळेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळावी, याबाबत शासनस्तरावर विचार करुन या शिष्यवृत्तीच्या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत खालील-प्रमाणे मार्गदर्शक सूचना सर्व संबंधितांना देण्यात येत आहेत.

१] माध्यमिक शाळांतील वार्षिक परीक्षा झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे निकाल साधारणत: एप्रिल महिन्याअखेर दिले जातात व पुढील शैक्षणिक वर्षी म्हणजे जूनपासून शाळा सुरु होतात. तेंव्हा मागील वर्षाचे निकालानुसार इयत्ता ५ वी ते इयत्ता १०वी या वर्गामधील मागील वार्षिक परिक्षेत कमीत- कमी ५०% व त्याहुन अधिक गुण मिळवून प्रथम व द्वितीय क्रमांकात उत्तीर्ण होणा-या पहिल्या दोन मागासवर्गीय [अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती- [धनगर वंजारींसह] आणि विशेष मागास प्रवर्ग. ] विद्यार्थ्यांची नावांची यादी सर्व माध्यमिक शाळांनी/संस्थांनी संबंधित जिल्ह्याचे समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांचेकार्यालयाकडे न चुकता प्रत्येक वर्षी जुलैअखेर पाठवावी.

२] सर्व जिल्ह्याचे समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनीही संबंधित जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळा/सर्व संस्थांकडून ही यादी न चुकता प्राप्त करुन घ्यावी.

३] सर्व संबंधित समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अशा प्राप्त करुन घेतलेल्या यादीनुसार सर्व पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती संबंधिचे धनादेश सर्व संबंधित शाळाप्रमुखांकडे/संस्थांकडे ऑगस्ट अखेर सुपूर्द करावेत.

Scanned by CamScanner

४] सर्व संबंधित माध्यमिक शाळा प्रमुखांनी/संस्थांनी शिष्यवृत्तीची रक्कम सर्व संबंधित शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना सप्टेंबर अखेरपर्यंत न चुकता वाटप करावी व त्याची पोच पावतीची प्रत [संबंधित शिष्यवृत्ती मिळाल्याचे विद्यार्थ्यांचे सही-स्वाक्षरी शिष्यवृत्ती प्राप्त झालेल्या दिनांकासहीतची स्थल प्रतीची प्रत संबंधित समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कार्यालयाकडे सप्टेंबरचे अखेरीस न चुकता पाठवावी.

५] सर्व संबंधित माध्यमिक शाळा प्रमुखांनी/संस्थांनी ह्या सर्व शिष्यवृत्तीच्या रकमेचे वाटप सर्व संबंधित पात्र विद्यार्थ्यांना केले आहे किंवा नाही. हे तपासणीचे काम सर्व संबंधित जिल्ह्यांचे समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कार्यालयाने ऑक्टोबरचे १५ तारखेपर्यंत पूर्ण करुन त्याबाबतचा आपला अहवाल संबंधित जिल्हा समाजकल्याण अधिकारी, विभागीय समाजकल्याण अधिकारी, आणि संचालक, समाजकल्याण, पुणे. यांचेकडे ऑक्टोबर अखेरपर्यंत न चुकता पाठवावा.

६] वरील सर्व सूचनांची सर्व संबंधितांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व कुठल्याही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

७] शासन निर्णय क्रमांक- इबीसी. १०९४/प्रक्र. १०९/मावक. २, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, दि. १७ ऑगष्ट- १९९५ अन्वये लागू करण्यात आलेली शिष्यवृत्तीची योजना सन- १९९८ या शैक्षणिक वर्षापासून अनुसूचित जाती विमुक्त जाती, व भटक्या जमाती [धनगर, वंजारींसह] आणि विशेष मागासप्रवर्ग विद्यार्थ्यांसाठी समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाकडून राबविली जाईल व अनुसूचित जमातीचे विद्यार्थ्यांकरिता आदिवासी विकास विभागाकडून राबविली जाईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
[ जे. पी. डांगे. ]
सचिव, समाजकल्याण.

प्रत

संचालक, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, [शिक्षण] महाराष्ट्र राज्य, पुणे.
उपसंचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे. [ परिपत्रकातील अनुक्रमांक १४४ येथील सूचनेस अनुसरुन सर्व संबंधितांना योग्य ते आदेश निदेश देण्याचे संदर्भात. ]
सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, [शासन निर्णय दि. १७. ८. ९५ चे प्रतीसह. ]
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई [परिपत्रकातील अनुक्र. १४४येथील सूचनेस अनुसरुन सर्व संबंधितांना योग्य ते आदेश निदेश देण्याचे संदर्भात. ].
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ [लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता] मुंबई/नागपूर.



Scanned by CamScanner

अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व कोषागाराधिकारी.
निवड नस्ती, का-मावक. २, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई. ४०० ०३२.

प्रत := नस्ती क्रमांक- इबीसी. १०९४/प्रक्र. १०९/मावक. २, दर माहितीसाठी ठेवण्यासाठी.

---

क्र. शिक्षण/भाप्रशि. २/माध्यशा/शिष्य/क४
समाजकल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे- १.
दिनांक- मार्च- १९९८.

प्रत := माहिती व पुढील कार्यवाहीस्तव...
१. विभागीय समाजकल्याण अधिकारी, [सर्व.]
२. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, [सर्व.]
३. समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, [सर्व.]
४. स्थायी आदेश नस्तीस माहितीस्तव ठेवण्यासाठी.

१०/३/९८
संचालक, समाजकल्याण विभाग,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१, यांच्याकरिता.

कांबळे/...

समाज कल्याण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
आवक क्रमांक ५८५ ...... कक्ष क्रमांक ........
दिनांक १४/२/०७ ...... स्वाक्षरी ........

माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करणे या योजनेत सुधारणा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक - इबीसी २००३/प्र.क्र.४६६/मावक-२,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ९ फेब्रुवारी २००७

वाचा :- १) शासन निर्णय शिक्षण व समाजकल्याण विभाग क्रमांक इबीसी-१०६६/५४७८७/जे, दिनांक २९.८.१९६६
२) शासन निर्णय समाजकल्याण ,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक इबीसी-१०९४/प्र.क्र.१०९/मावक-२, दिनांक १७.८.१९९५
३) संचालक, समाजकल्याण ,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक : सकसं/शिक्षण/भासशि/माध्य.शिष्य./वाढ/अधिभार/२००६-०७/का.४/४३९९, दिनांक १४.११.२००६

**प्रस्तावना-** शासन निर्णय क्रमांक-इबीसी-१०९४/प्र.क्र.१०९/मावक-२,दिनांक १७.८.१९९५ अन्वये प्रत्येक इयत्तेतून ५०% हून अधिक गुण मिळविणाऱ्या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लागू करण्यात आलेली आहे. यानुसार इ.५ वी ते ७ वी मधील २ गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना रु.२०/- दरमहा (१० महिने) त्याचप्रमाणे इ.८ वी ते १० मध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना रु.४०/- दरमहा शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेनुसार सध्या दिली जाणारी शिष्यवृत्ती अत्यंतअल्प प्रमाणात असल्याने, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या या शिष्यवृत्तीच्या दरात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय -** या योजनेचा विचार करुन शासन निर्णय दिनांक १७.८.१९९५ च्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनेच्या नियमावलीप्रमाणे सन २००६-०७ पासून या शैक्षणिक वर्षापासून शिष्यवृत्तीच्या दरात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देत आहे.

| | |
|---|---|
| इ.५ वी ते ७ वी | रु.५०/- दरमहा (१० महिने, जून ते मार्च) |
| इ.८ वी ते १० वी | रु.१००/-दरमहा (१० महिने, जून ते मार्च) |

३. या बाबीवर होणारा खर्च "मागणी क्रमांक एन -३ -२२२५-अनु.जाती, अनु.जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१,अनुसूचित जातीचे कल्याण ,२७७ शिक्षण ,जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने, स्थानिक क्षेत्र, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०८)(०२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने (२२२५ ०५ ४८ )(विघयो) ,४१ सहाय्यक अनुदाने (अर्थोपाय अग्रीमाशी समायोज्य) " या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येऊन हा खर्च यासाठी प्रतीवर्षी करण्यात येणाऱ्या मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

कृ.मा.प.

Scanned by CamScanner

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौ.संदर्भ क्रमांक ५५/०७/व्यय-१४, दिनांक ५.२.२००७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर दर्शविण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००७०२१२१२५५१९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( रमेश म.उबाळे )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, वि.जा.भ.ज., इमाव, विमाप्र. महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व समाजकल्याण अधिकारी, गट-ब, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा परीक्षा)/(लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाअधिकारी ,मुंबई/निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय १४ / अर्थोपाय ), मंत्रालय, मुंबई.
सामाजिक न्याय विभागातील सर्व कार्यासने
संगणक कक्ष, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय मुंबई (प्रसिध्दीकरीता)
निवड नस्ती, मावक - २

Scanned by CamScanner